व्यवस्थापन प्रतिनिधींमधून अधिसभेवर, प्राचार्यांमधून अधिसभेवर, अध्यापकांमधून अधिसभेवर व विद्या परिषदेवर, विभागप्रमुखांमधून अभ्यासमंडळावर निवडून द्यावयाच्या सदस्यांकरिता निर्वाचक गण (Electoral Roll) तयार करणेस्तव माहिती पाठविणेसाठी ***मुदतवाढ देण्याबाबत*****.......**

---

॥अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव - ४२५००१
# NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON– 425001

**जा.क्र. उमवि/२/निवडणूक/३०/२०१७** **दि.०३/०७/२०१७**

## -: निवेदन :-

**संदर्भ:- विद्यापीठाने खाली निर्गमित केलेले पत्र, अधिसूचना व निवेदन इत्यादि.**

१) विद्यापीठ पत्र क्र.उमवि/२/निवडणूक/०९/२०१७, दिनांक ०६.०६.२०१७.
२) विद्यापीठ पत्र क्र.उमवि/२/निवडणूक/१०/२०१७, दिनांक ०६.०६.२०१७.
३) विद्यापीठ पत्र क्र.उमवि/२/निवडणूक/११/२०१७, दिनांक ०६.०६.२०१७.
४) विद्यापीठ पत्र क्र.उमवि/२/निवडणूक/१५/२०१७, दिनांक १५.०६.२०१७.
५) विद्यापीठ पत्र क्र.उमवि/२/निवडणूक/१८/२०१७, दिनांक १६.०६.२०१७.
६) विद्यापीठ पत्र क्र.उमवि/२/निवडणूक/२३/२०१७, दिनांक २४.०६.२०१७.

महाराष्ट्रातील सर्व अकृषी विद्यापीठांसाठी महाराष्ट्र शासनाने दिनांक ०१ मार्च, २०१७ पासून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ लागू केलेला आहे. सदर अधिनियमानुसार विद्यापीठ प्राधिकरणाच्या निवडणुकांसाठी माहिती मागविण्याबाबत उपरोक्त संदर्भिय पत्र, अधिसूचना व निवेदन प्रसिध्द करण्यांत आलेले आहे.

मात्र, विविध संघटनांकडून माहिती पाठविणेबाबत मुदत वाढविण्यासाठी मागणी करण्यांत येत असून, मतदानापासून कोणताही घटक वंचित राहू नये यास्तव सर्व संघटनांच्या निवेदनांचा साकल्याने विचार करुन मा.संस्थाचालक, मा.प्राचार्य/मा.संचालक, मा.विभागप्रमुख, विद्यापीठातील व संलग्नीत महाविद्यालये/ मान्यताप्राप्त परिसंस्थांमधील अध्यापक या गटांसाठी ऑनलाईन अर्ज भरण्याकरिता व आवश्यक त्या कागदपत्रांसह माहिती सादर करणेसाठी मुदतवाढ देण्यांत येत असून, त्या-त्या गटातील सर्व संबंधितांनी सोमवार, दिनांक १०.०७.२०१७ पर्यंत ऑनलाईन अर्ज भरुन, आवश्यक त्या कागदपत्रांसह सदरचे अर्ज, मंगळवार, दिनांक ११.०७.२०१७ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत किंवा तत्पूर्वी विद्यापीठ कार्यालयात पोहोचतील, अशा बेताने सादर करावेत. सदर तारखेनंतर प्राप्त झालेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्वीकारले जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी, ही विनंती.

तरी सर्व संबंधितांनी मुदतवाढीबाबत नोंद घेऊन कार्यवाही करावी, ही विनंती.

3/7/17

**(प्रा.अं.बा.चौधरी)**
प्र.कुलसचिव तथा
निवडणूक निर्णय अधिकारी